28 JAN 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या यश खंडागळेने जिंकले सुवर्ण

- अ. भा. आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत धडक कामगिरी
- २९४ किलो वजन उचलले, महिला गटात निकिता कमलाकरने मिळवला सहावा क्रमांक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संघातर्फे ७१ किलो वजन गटातून प्रतिनिधीत्व केलेल्या यश खंडागळेने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. त्याने वेटलिफ्टिंगमधील स्नॅच या प्रकारातील १३४ किलो व क्लीन ॲण्ड जर्क या प्रकारातील १६० किलो असे मिळून २९४ किलो वजन कौशल्य पणाला लावत उचलले. त्याची हीच ताकतवर कामगिरी त्याला सुवर्ण पदक मिळवून देणारी ठरली.



यशच्या गटातील पुणे विद्यापीठाच्या शुभम काळभोरने २९२ किलो वजन उचलून रौप्य पदक पटकावले. तसेच चंदिगड युनिव्हर्सिटीच्या आदित्यसिंगने २८८ किलो वजन उचलून कांस्य पदक प्राप्त केले. याचबरोबर शिवाजी विद्यापीठ संघातील निकिता कमलाकरने महिलांच्या ५८ किलो वजन गटात १८१ किलो वजन उचलून सहावा क्रमांक मिळवला. सुवर्ण पदक विजेत्या यश खंडागळेसह सहाव्या स्थानावर राहिलेल्या निकिताची आगामी काळात होणाऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी निवड करण्यात आली आहे. यश व निकिताला शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. रवींद्र चव्हाण (देवचंद कॉलेज) व प्रशिक्षक प्रा. डॉ. प्रशांत पाटील (श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

28 JAN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर ६३१ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील २४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ६३१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने जिल्ह्यातील विविध ७२ परीक्षा केंद्रावर पार पडल्या आहेत. परीक्षांसाठी ३२०१ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

28 JAN 2026
पुढारी

# प्रौढांची मैदानी स्पर्धा रविवारी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर मास्टर ॲथलॅटिक असोसिएशनच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे जिल्हा स्तरीय प्रौढांच्या मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार (दि. १) फेब्रुवारी रोजी शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक मैदानावर ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेअंतर्गत चालणे, धावणे, उंचउडी, लांब उडी, भाला फेक, गोळा फेक आदी स्पर्धा होणार आहेत.

स्पर्धेतील विजयी स्पर्धकांची निवड राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संघटनेचे अध्यक्ष बी. जी. भोगम यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
27 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# विद्यापीठात महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले आणि विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या वाटचालीत एक नवा इतिहास रचला गेला. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाल्याने शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांना त्याचा मोठा आनंद व अभिमान वाटला. ध्वजवंदनानंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह उपस्थित अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. धनंजय सुतार, वसंत एकले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

27 JAN 2026

सकाळ

# शैक्षणिक संस्थांमधील अमली पदार्थांवर लक्ष ठेवा : जिल्हाधिकारी

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : शेजारील जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांवर कारवाई केली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील अमली पदार्थ प्रतिबंधात्मक कारवायांना गती द्या. शैक्षणिक संस्थांमध्ये अमली पदार्थांची विक्री, खरेदी होणार नाही यावर कटाक्षाने लक्ष द्या, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज दिल्या. अमली पदार्थ कारवाई संदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक धिरजकुमार बच्चू उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, 'जिल्ह्यातील पर्यटन स्थळे, डोंगर परिसर, फार्म हाऊस या ठिकाणी तसेच राधानगरी, चंदगड, गगनबावडा या पर्यटन स्थळी पोलिस विभागामार्फत तपासणी करून अमली पदार्थ खरेदी वा विक्री होणार नाही याची खातरजमा करावी. शिरोली, हातकणंगले व गोकुळ शिरगाव या औद्योगिक वसाहतीमध्ये बंद पडलेले तसेच सुरू केमिकल कारखाने एमआयडीसीचे अधिकारी व पोलिस विभागामार्फत तपासण्यात यावेत. शिक्षण व पोलिस विभागामार्फत शहर व जिल्ह्यातील माध्यमिक व व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती कार्यक्रम घेण्यात यावेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील पोलिसपाटलांमार्फत ग्राम स्तरावर अमली पदार्थ विक्रीबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी.' महिला व बाल विकास विभाग अधिकारी सुहास वाईंगडे, माहिती अधिकारी फारुख बागवान यांच्यासह पोलिस, राज्य उत्पादन शुल्क, अन्न औषध प्रशासन, औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

27 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# समाजाची गरज ओळखून नवसंशोधन करा

## प्राचार्य डॉ. अरुण पाटील : न्यू कॉलेजमध्ये आयटी स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : विद्यार्थ्यांनी स्वतःचे कौशल्य विकसित करावे. परदेशी भाषा अवगत करावी. समाजाची गरज ओळखून नवसंशोधनाकडे त्यांनी वळावे. ॲप आणि रोबोटिक तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर द्यावा, असे आवाहन पुणे येथील विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँण्ड सायन्सचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी केले.

येथील न्यू कॉलेजच्या कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या न्यू होरायझन २ के २६ या आंतरमहाविद्यालयीन आयटी स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे, तर आमदार प्रा. जयंत आसगावकर प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील यटी स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. अरुण पाटील. शेजारी आमदार प्रा. जयंत आसगावकर, बी. जी. बोराडे, व्ही. एम. पाटील आदी.

अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासह आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी न्यू होरायझनसारख्या स्पर्धा महत्त्वाच्या असल्याचे आमदार आसगावकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना वेळोवेळी अद्ययावत प्रयोगशाळा, तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याची ग्वाही अध्यक्ष बोराडे यांनी दिली. बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्सचा विद्यार्थी सोहम देशपांडे याने शिवाजी विद्यापीठाच्या शार्क टँक कम हॅकेथॉन स्पर्धेत रूमीफाय ॲप सादर करत प्रथम क्रमांक पटकविला. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला.

डी. जी. किल्लेदार, वाय. एस. चव्हाण, पी. सी. पाटील, वाय. एल. खाडे, उदय पाटील, आर.डी. ढमकले, एम. वाय. कांबळे, अश्विनी अष्टेकर आदी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सानिया चौगुले, अनिरुद्ध पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तस्लिमा गोलंदाज यांनी आभार मानले.

27 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन

## • शिवाजी विद्यापीठात घडला इतिहास

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आल्याच्या या घटनेचे उपस्थित सर्वांनीच टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व आणि औचित्य या निमित्ताने नव्याने अधोरेखित झाले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू व शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पुणे विद्यापीठात ध्वजवंदन करण्यात येणार असल्याने प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाल्याने शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांना त्याचा आनंद व अभिमान वाटला. प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांचे उपस्थितांकडून टाळ्यांच्या गजरात अभिनंदन करण्यात आले. डॉ. जाधव यांनी यावेळी सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) छात्रांनी संचलन करून ध्वजास मानवंदना दिली. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले. ध्वजवंदनानंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह उपस्थित अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, तानाजी गुरव, शरद बनसोडे, सागर डेळेकर, धनंजय सुतार, सुरक्षा अधिकारी वसंत एकले, श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत सागर डेळेकर, सुहासिनी पाटील, महादेव देशमुख आदी.**

2 8 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ६३१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ६३१अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. मंगळवारी बीबीए, बीसीए, बीबीए, एमबीए (इंटिग्रेटेड), बी.टेक., बीएड, एम.टेक., बी.फार्मसी आदी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध ७२ केंद्रांवर सुरळीत झाल्या. परीक्षेला ३ हजार २०१ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २७ रोजी एमए (इंग्रजी), एमएसडब्ल्यू, बीए, फाईव्ह इयर लॉ, एमए (मानसशास्त्र) असे २४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

2 8 JAN 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय अन्वेषण संशोधन स्पर्धा सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात येथे नुकतीच झाली. यात शिवाजी विद्यापीठाने यश संपादन केले. स्पर्धेमधील सहा संशोधन शाखेसाठी विद्यापीठामार्फत २३ जणाचा संघ सहभागी झाला होता. विद्यापीठ संघामधील इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी शाखेतून शुभम गिरीगोसावी, तेजस यादव, नीलेश सूर्यवंशी व स्वप्नाली मगदूम यांनी प्रथम क्रमांक मिळवला. संघव्यवस्थापक म्हणून डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. कविता वड्राळे, प्रा. प्रणाली टाकले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
28 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून राजर्षी शाहू संगीत रजनी कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. २९ ते ३० दरम्यान संगीत रजनी दररोज संध्याकाळी ५:३० वाजता राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे. या संगीत रजनीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार आहे. प्रभारी प्र –कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. पहिल्या सत्रामध्ये पुण्यातील मौशमी जाजू यांचे कथ्थक नृत्य होणार आहे. मुंबईतील गांधार देशपांडे यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. बेळगाव येथील डॉ. सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांच्या हार्मोनियम (संवादिनी) वादनाची जुगलबंदी होणार आहे. पुण्यातील पं. विजय कोपरकर यांच्या शास्त्रीय गायनाने राजर्षी शाहू संगीत रजनीची सांगता होणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमांना आशय कुलकर्णी (तबला), शुभम खंडाळकर (गायन), ज्ञानेश्वर अंडील (पखवाज आणि पढंत), यशवंत थिटे (हार्मोनियम), प्रदीप कुलकर्णी (तबला), गिरीधर कुलकर्णी (तबला), महेश देसाई (तबला), सारंग कुलकर्णी (हार्मोनियम) व स्वरुप दिवाण (हार्मोनियम) यांची साथसंगत लाभणार आहे.

2 8 JAN 2026

पुण्यनगरी

# ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील यांना पुरस्कार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ख्यातनाम अनुवादक, कवी व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ लेखक प्रा. राजन गवस यांच्या हस्ते २४ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील, अशी माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. 'आणि म्हणूनच', 'आणि तोपर्यंत', 'कवितेसमक्ष' हे डॉ. पाटील यांचे महत्त्वाचे समीक्षा ग्रंथ होत. १९६० नंतरच्या आधुनिक मराठी साहित्याचा पुरस्कार करण्यामध्ये प्रा. पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांनी भीष्म साहनी यांच्या 'तमस' या कादंबरीचा केलेला मराठी अनुवाद विशेष गाजला. पुरस्काराच्या निवड समितीचे सदस्य म्हणून प्रा. एकनाथ पगार (देवळा), प्राचार्य गोविंद काजरेकर (बांदा), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) यांनी काम पाहिले.

28 JAN 2026

सकाळ

# ज्येष्ठ समीक्षक चंद्रकांत पाटील यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार'

## विद्यापीठाकडून घोषणा; फेब्रुवारीमध्ये वितरण

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील अनुवादक, कवी आणि समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम ५१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे आहे. ज्येष्ठ लेखक प्रा. डॉ. राजन गवस यांच्या हस्ते २४ फेब्रुवारीला हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असतील.

प्रा. चंद्रकांत पाटील यांची समीक्षा ही मराठीतील महत्त्वाची आहे. सर्जनशील लेखनाबरोबरच त्यांनी अनुवाद व समीक्षा या प्रकारात महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाचे स्वरूप हे द्वैभाषिक आहे. मराठी कविता भारतीय स्तरावर नेण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. मराठी हिंदीतील सांस्कृतिक अनुबंध अधिक विकसित करण्यामध्ये प्रा. पाटील यांचे लेखन महत्त्वाचे ठरले आहे. 'आणि म्हणूनच', 'आणि तोपर्यंत' व 'कवितेसमक्ष' हे त्यांचे



चंद्रकांत पाटील

महत्त्वाचे समीक्षा ग्रंथ होत. विश्लेषक स्वरूपाची समीक्षा असे पाटील यांच्या समीक्षेचे स्वरूप आहे. १९६० नंतरच्या आधुनिक मराठी साहित्याचा पुरस्कार करण्यामध्ये प्रा. पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. ते साठोत्तरी काळातील मराठी-हिंदी साहित्याचे विशेषतः कवितेचे महत्त्वाचे टीकाकार आणि समीक्षक असून, भीष्म साहनी यांच्या 'तमस' या कादंबरीचा त्यांनी केलेला मराठी अनुवाद विशेष गाजला. आजवरच्या त्यांच्या एकूणच समीक्षा कारकिर्दीचा सन्मान म्हणून या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येत आहे. पुरस्काराच्या निवड समितीचे सदस्य म्हणून प्रा. एकनाथ पगार (देवळा), प्राचार्य गोविंद काजरेकर (बांदा), प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) यांनी काम पाहिले असल्याची माहिती मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

2 8 JAN 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात ६३ वर्षांत प्रथमच महिला अधिकाऱ्याच्या हस्ते ध्वजवंदन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या वाटचालीत प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू आणि शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पुणे विद्यापीठात ध्वजवंदन करण्यात येणार असल्याने प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते सकाळी ठीक आठला विद्यापीठात ध्वजवंदन झाले. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांनी संचलन करून मानवंदना दिली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत सादर केले. ध्वजवंदनानंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, महादेव देशमुख, तानाजी गुरव, शरद बनसोडे, सागर डेळेकर, धनंजय सुतार, वसंत एकले, श्रीकृष्ण महाजन, सिद्धार्थ शिंदे, आदी उपस्थित होते.

28 JAN 2026
लोकमत

# महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले आणि विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या वाटचालीत नवा इतिहास रचला गेला.

विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच महिला अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन केल्याच्या या घटनेचे उपस्थित सर्वांनीच टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) छात्रांनी संचलन करून ध्वजास मानवंदना दिली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत सादर केले. ध्वजवंदनानंतर प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह उपस्थित अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.